डॉ. सुहास यशवंतराव पाटील, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः मवैअ-२०१७/प्र.क्र.१६/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ११ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/डॉ. पाटील/ स्वेसेनि/टे.क्र.५/२ब/ १८७०/१६, दि. ३०/१२/२०१६.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेले डॉ. सुहास यशवंतराव पाटील, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, जिल्हा रुग्णालय, सिंधुदूर्ग यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०८.०२.१९९० अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. तत्पुर्वी ते दि.११.०७.१९८६ पासून अस्थायी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांची दि. ११.०७.१९८६ ते दि.०७.०२.१९९० पर्यंतची अस्थायी सेवा ही दि.१८.११.२०१० च्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्ती विषयक लाभासाठी ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यानुसार ते शासन सेवेत दि.११.०७.१९८६ रोजी रुजू झाल्यापासूनची त्यांची पुढील सेवा ही सेवानिवृत्तीसाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. पाटील, यांनी म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केलेली असल्याने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. पाटील यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. पाटील हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, डॉ. पाटील यांनी दि. ३१/०८/२०१६ च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२) (५) मधील तरतुदींनुसार डॉ. सुहास यशवंतराव पाटील, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, हे दि.०१/१२/२०१६ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१११२५३०१२८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.10.11 14:13:46 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर.
४) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग.
७) डॉ. सुहास यशवंतराव पाटील, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर यांचे मार्फत
८) निवडनस्ती सेवा-३.